
# राजधानीत आजपासून साहित्योत्सव

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

अक्षरांचा उत्सव (फेस्टिव्हल ऑफ लेटर्स) म्हणून देश-विदेशांत प्रसिद्ध असलेल्या साहित्य अकादमीच्या साहित्योत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. आज, शुक्रवारपासून १२ मार्चपर्यंत नवी दिल्लीतील रवींद्र भवनाच्या परिसरात होणाऱ्या या महोत्सवात यंदाही वेगळ्या कार्यक्रमांची भरगच्च मेजवानी साहित्यरसिकांना मिळेल, असा विश्वास साहित्य अकादमीचे मुख्य सचिव डॉ. के. श्रीनिवास राव यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'शी बोलताना व्यक्त केला.

मागच्या वर्षीचा साहित्योत्सव जगातील सर्वांत मोठा साहित्य महोत्सव ठरला होता, तर १००हून अधिक कार्यक्रम असणारा या वर्षीचा महोत्सव आशियातील सर्वांत मोठा महोत्सव असेल असा विश्वास डॉ. राव यांनी व्यक्त केला. यंदाच्या साहित्योत्सवात काव्यवाचन, रसग्रहण, विविध विषयांवरील मान्यवरांचा सहभाग असलेली चर्चासत्रे, मुलांसाठीचे खास दालन व त्यांच्या कलागुणांचे आविष्कार, सांस्कृतिक कार्यक्रम आदी रेलचेल असेल.



इंग्रजी व भारतीय साहित्यातील विविधता साजरी करणाऱ्या या साहित्योत्सवात शनिवारी (८ मार्च) अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते २०२४साठीच्या २२ भाषांतील साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान केले जातील. कमानी सभागृहात हा कार्यक्रम होईल. ज्येष्ठ लेखक महेश दत्तानी हे अध्यक्षस्थानी असतील. मराठीसाठी ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना यंदा हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

रविवारी (९ मार्च) प्रख्यात इंग्रजी लेखक उपमन्यू चॅटर्जी यांचे संवत्सर व्याख्यान होईल. या वर्षी अकादमीच्या राष्ट्रीय चर्चासत्राचा विषय 'भारतीय साहित्यिक परंपरा: वारसा आणि विकास' हा असणार आहे.

मागच्या वर्षीच्या साहित्योत्सवात तीन राज्यांचे राज्यपाल सहभागी झाले होते. यंदा उद्घाटन कार्यक्रम वगळता आरिफ मोहम्मद खान (बिहार) व श्रीधरन पिल्लई (गोवा) हे राज्यपाल सहभागी होणार आहेत. यंदा इंद्रजित घुले, प्रज्ञा पवार, विश्वास पाटील, चंद्रकांत पाटील आदींसह मराठीतील १५ ते २० लेखकांचा विविध साहित्यिक कार्यक्रमांत सहभाग राहील.

**७००हून अधिक लेखक, विद्वानांचा सहभाग**

यंदा देशाच्या कानाकोपऱ्यातून ५०हून अधिक भारतीय भाषांमधील ७००हून अधिक लेखक आणि विद्वान या साहित्योत्सवात येत आहेत. दिव्यांग, ईशान्येकडील लेखकांचा मेळावा, लक्ष्मीनारायण त्रिपाठी यांचा सहभाग असलेला एलजीबीटीक्यू लेखकांचे संमेलन, आदिवासी लेखकांचा मेळावा ही यंदाची काही वैशिष्ट्ये असतील. कॉमिक्सला साहित्य मानावे काय, उद्योग व साहित्य, भारतीय साहित्यावरील कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) परिणाम अशा अनेक वेगळ्या विषयांना यंदाच्या साहित्योत्सवात स्थान देण्यात येणार आहे.